म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा
दा. क्र. १००१०

१९९५०

# कड्यावर गाडी

IRBK-0101997
IRBK-0101997

रघुवीर सामंत

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बाल वाङ्मय
वा. नं २७१

१
७ आणे



अमर ज्योति वाङ्मय

अभिनव सत्यकथा - २ -

# कड्यावरील गाडी

-- आणि इतर कथा --

## 'अमर ज्योति वाङ्मय'

[ स्थापना ५ डिसेंबर १९४३ ]

चालकः—सौ. स्नेहल सामंत, पी. ए.

मुख्य संपादकः श्री. रघुवीर सामंत, बी. ए. बी. टी.

**'५ डिसेंबर १९४३ च्या आमच्या योजना-पत्रकांत जाहीर केल्याप्रमाणें,** प्रस्तुत ('ज्योति–सामंत–स्मारक') संस्थेचा, दरवर्षी दिवाळींत धनत्रयोदशीच्या दिवशीं, एकाच गटांत, **लहान मोठीं विविध वाङ्मयाचीं सर्वांग-सुंदर पुष्पें प्रकाशित करण्याचा संकल्प, आज या पहिल्या गटाच्या रूपानें मूर्त स्वरूपांत येत आहे.**

**उगवत्या–वाढत्या पिढीला आनंद–ज्ञान–दायक असें नव्या दृष्टीचें, पद्धतशीर, सात्विक-सोज्वल आदर्श वाङ्मय, तज्ञांकडून मुद्दाम लिहवून घेऊन उपलब्ध करून द्यावयाचें** हा या स्मारक संस्थेचा मनोदय आहे. तो अधिक सुलभ व्हावा, म्हणून विषयपरत्वें **'मनोरंजक' व 'ज्ञान'** असे आम्ही मुख्य दोन स्थूल विभाग कल्पिले आहेत वयपरत्वें–१) **'शिशुश्रेणी'** (वय वर्षे ७ पर्यंत), (२) **'बाल-श्रेणी'** (वय वर्षे १२ पर्यंत,) (३) **'किशोर श्रेणी'** (वय वर्षे १४,) व (४) **'कुमार-श्रेणी'** (वय वर्षे १७ पर्यंत) आम्ही सर्वसाधारण चढते टप्पे ठरवले आहेत. आणि याच विषय-विभागांच्या व वयाच्या--टप्प्यांच्या स्थूल आराखड्याचा अधिक सूक्ष्म विचार करून त्यांत बसणाऱ्या सर्व प्रकारच्या विविध आकर्षक पुस्तकांचा दरवर्षी होणाऱ्या आमच्या असल्या प्रकाशनगटांत समावेश होईल, अशी काळजी घेण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहों.

तथापि, दरवर्षी होणाऱ्या या **'दिपावली प्रकाशनां'** च्या गटाची व्याप्ती सर्व विभागांपर्यंत व सर्व टप्प्यां--श्रेणींपर्यंत पोहोंचणें. हें संस्थेच्या आदल्या वर्षीच्या प्रकाशनाला मिळणाऱ्या रसिकाश्रयावर, संस्थेच्या स्थिर आर्थिक परिस्थितीवर व त्या त्या वेळच्या भोंवतालच्या अनुकूल प्रतिकूल परिस्थितीवरच अवलंबून रहाणार, हें अर्थातच लक्ष्यांत घेतलें पाहिजे.—तरी पण होतां होईतों **कमींत कमी बारा ते अठरा पुष्पांची गुंफण दर दिवाळींत संस्था करूं शकेल** अशी आमची आज तरी इछा–आकांक्षा आहे. आम्हाला तशी उमेद आहे.

कुमार–श्रेणी ........................ [ अभिनव सत्यकथा ]

[ मनोरंजन ] — २ —

# — कड्यावरील गाडी —

आणि

## इतर कथा

१०२८६

— लेखक —

श्री. रघुवीर सामंत, श्री. यज्ञेश्वर माधव भेंडे,
बी. ए., बी. टी. ( ठाणे ) [illegible] ( मुंबई )

नों. दि ........

रघुवीर सामंत संपादित

अम

ज्योति

[ १

IRBK-0101997
IRBK-0101997

मूल्य ७ आणे ] ५ डिसेंबर १९४८ [ प्रथमावृत्ति

कुमार-कुमारींस— ★

या पुष्पांतील प्रत्येक गोष्टीची मध्यवर्ती कल्पना तुम्हाला छत्र वाटेल. त्या कल्पनेची मांडणी कुतूहल कायम ठेऊन कशी केली आहे, तें तुम्ही काळजीपूर्वक अभ्यासावें.

सत्यकथा या इतर उत्तम काल्पनिक कथांहून एवढया एकाच दृष्टीनें निराळ्या असतात, कीं, त्यांतील बहुतेक घटना एकांत एक गुंतलेल्या स्वरूपांतच सत्य-सृष्टींत घडलेल्या असतात. काल्पनिक कथांतील घटनांनाही सत्याचा आधार असल्याशिवाय त्या छत्र होणार नाहींत. पण लेखक त्या-वेळीं निरनिराळ्या वेळच्या विविध अनुभवांची निवड करतो व त्यांना आपल्या कलादृष्टीची चाळण लावून आपल्याला पाहिजे त्या कलात्मक पद्धतीनें त्या प्रसंगांची रचना करतो. सत्यकथा सत्य घडलेल्या असतात; पण त्यांच्या मांडणींतही ( त्या अधिक कलात्मक करण्यासाठीं ) रचना ही करावी लागतेच.

या कथांच्या वाचनावेळीं तुम्ही या दृष्टीनेंच त्यांचें अवलोकन करावयास पाहिजे.

वर्णनासाठीं वापरावयाच्या भाषाशैलीची, परिच्छेदांच्या मांडणीची, एखादी घटना हळूहळू उकलून वर्णनाच्या ओघांत वाचकाची उत्सुकता वाढवण्याची, इत्यादी सर्वांगीण कलाच एकाद्या कलाकृतीला स्वारस्य व सौंदर्य आणूं शकतें; या दृष्टीनेंही या कथांचें रसग्रहण करा.

आणि या धर्तीवरच आपल्या माहितींतील, वाचनांतील, प्रत्यक्ष अनुभवांतील सत्य घटनांची कलात्मक मांडणी करण्याचा स्वतंत्र प्रयत्न करीत रहा.

तुमचा–**संपादक**

---

–: मुद्रक :–

**अनंत वा. देसाई**, एम. ए.
लोयल प्रिंटिंग प्रेस,
१३–१९ हमाम स्ट्रीट
फोर्ट, मुंबई,

–: प्रकाशक :–

सौ. **स्नेहल सामंत**, बी. ए.
चालक–'अमर ज्योति प्रकाशन'
१४ बी. हरजीवनदास एस्टेट,
व्हिन्सेन्ट रोड : दादर :
मुंबई १४.

# १-कड्यावरील गाडी....

## १

स्वित्झर्लंडमधील गोष्ट आहे ही—

एका सणाच्या दिवशीं एका बाईनें एक बग्गी भाड्यानें ठरवली होती. त्यांत तिनें आपल्या मुलांना घातलें होतें व ती जवळच्याच एका सुंदर ठिकाणीं वनभोजनाला चालली होती.

वनभोजनाचें ठिकाण सुंदर वनश्रीचें-एका दरींत होतें. तेथें जायचा रस्ता एक डोंगरांतून उतरत होता. मध्यें एक भयंकर खिंड होती.

ती बाई व मुलें हसत-खेळत होतीं. गाडी चढण चढून बरीच वर आली होती. खिडकींतून दोन्ही बाजूला लांबवर सुंदर देखावे दिसत होते. खोलखोल खालीं हिरवींगार शेतें पसरलीं होतीं.

## २

इतक्यांत एकाएकीं बग्गी चालतां चालतां एक हिसका खाऊन जागच्या जागीं थांबली.

आंतलें हसणें-खिदळणें थांबलें. लगाम हातीं घट्ट धरलेल्या गाडीवानाच्या तोंडून एक अस्पष्ट पण भयप्रद आवाज ऐकूं आला.

'काय झालं?' म्हणून पहाण्यासाठीं ती बाई खिडकींतून बाहेर डोकावली. समोंवार पहातांच तिच्याही छातींत धस्स झालं!—

जेमतेम गाडी राहील इतका तो रस्ता निरुंद होता. डाव्या बाजूला काळाकभिन्न खबदाड खडक सुमारें तीसपस्तीस फूट उंच

उभा राहून, जणूं रस्त्यावरील गाडीकडे खालीं मान करून पहात होता. उजव्या बाजूला डोंगर शेंकडों फूटपर्यंत खालीं उतरत होता. समोर जाणाऱ्या रस्त्यानें चंद्रकोरीप्रमाणें एका बाजूस वळण घेतलें होतें.

एक पुढें व त्याच्या मागें दोन असे एकूण तीन घोडे गाडीला जुंपले होते. पुढला घोडा, कां कोण जाणें, एकदम बुजून जरा उजव्या बाजूला वळला होता. व रस्त्याच्या कडेच्या उजव्या बाजूच्या उतरणीवर त्यानें पुढले दोन पाय टाकले होते.

जणूं काय तो गाडीसकट आतां खालीं उडी घेण्यासाठीं मनांतल्या मनांत अंक मोजत आहे असेंच कोणालाही वाटावें.

तें सारें एका क्षणांत लक्षांत येऊन त्या बाईच्या छातींत एकदम धस्स झालें. क्षणभर तिच्या साऱ्या अंगात भीतीनें हुडहुडी भरली.

## ३

पण झटकन् तिनें मनावर ताबा मिळवला व गाडींतून ती अगदीं धिम्या पावलानें बाहेर पडली.

गाडीवान तर आपल्यासमोर दिसणाऱ्या भयानक दरीमुळें व उभ्या उभ्या चाळू असलेल्या त्या घोड्याच्या भीतीप्रद हालचालीमुळें, जागच्या-जागीं खिळला होता;....हातांतल्या साऱ्या लगामी खेंचून मुक्या पुतळ्या-सारखा तो आपल्या जागेवर निश्चल बसला होता.

गाडींतलीं लहान मुलें किंवा ती बाई कोणीही भीतीनें एकदांच जरी ओरडती, तरी क्षणार्धांत सारा अनर्थ झाला असता.

बाई प्रथम भेदरली; पण मग गाडींत बसलेलीं आपली गोड मुलें पहातांच तिच्या मातृहृदयाला हजार माणसांचें बळ आलें.

एका क्षणांत तिनें निर्णय घेतला. हळूहळू पावलें टाकत ती उजव्या बाजूच्या उतरणीकडे वळली. तिनें हातानेंच आपल्या भेदरलेल्या मुलांना गप्प बसायची खूण केली; व पुढें पाय टाकून उभ्या असलेल्या घोड्यासमोर जाऊन ती उतरणीवरच उभी राहिली.

जरा चुकलें असतें तर बुजलेल्या घोड्यानें तिच्या अंगावरूनच खालच्या खोल दरींत गाडीसकट—तिच्या मुलांसकट—उडी टाकली असती !

४

—पण त्यावेळीं तिच्या अंगांत अगदीं असामान्य धिटाई संचारली.

तिनें झटकन् उजव्या हातानें घोड्याची लगाम घट्ट धरली व डाव्या हातानें घोड्याचे डोळे बंद केले; आणि एखाद्या माणसाला काकुळतीनें समजुतीनें सांगावें, तसें ती त्या घोड्यांच्या कानांत विनन्ती केल्यासारखें पुन्हां पुन्हां हळूच पुटपुटली—" हं....हं....मागें हो जरा... मागें हो !—"

आणि असें म्हणत तिनें घोड्याला रस्त्याकडे वर ढकललेंही !—

त्याचा परिणाम म्हणून कीं काय कोण जाणें, घोड्यानें आपले दोन्ही पाय मागें घेतले.

गाडीवानानें तेवढ्यांतच भानावर येऊन लागाम खेंचून गाडी समोरच्या वळणाकडे वळवली.

घोडे रस्त्यानें नीट चालूं लागले.

आयुष्यांतलें तें भयंकर गंडांतर टळलें होतें. तिच्या प्रसंगावधनानें त्या दिवशीं सारें कुटुंब अनर्थातून, मृत्यूच्या जबड्यांतून वाचलें होतें.

पण सर्व सुरक्षितता आल्यावर मात्र त्याच गाडींतल्या मऊमऊ गादीवर बसल्या बसल्या त्या बाईच्या अंगाला दरदरून घाम सुटला !

# २-दर रात्रीं कैदी !....

' खून ! खून !—निरापराध्याचा अमानुष खून ! '

त्या फ्रेंच समुद्र किनाऱ्याच्या सेंट अँद्रीज गांवीं १८८८ सालीं एके दिवशीं सकाळीं सर्वांच्या तोंडोतोंडी हीच बातमी फिरत होती. अँद्री मोनेचा खून झाला होता.

अँद्री हा एक मध्यम श्रीमंत व्यापारी; आपल्या बायकोसह त्या गांवीं कांहीं दिवस आनंदानें घालवण्यासाठीं आला होता.

आधल्या रात्रीं झोंपण्यापूर्वी, रात्रीं मौजेनें समुद्र किनाऱ्यावर आंघोळ करण्यासाठीं तो घरांतून बाहेर पडला होता.

आणि आज सकाळीं एक पाववाला पोरगा समुद्र कांठानें जात असतां त्याला अँद्रीचें प्रेत आढळलें होतें; भरतीचें पाणी जेथपर्यंत भिडे, त्याच्या अलीकडे तें पडलें होतें. अँद्रीच्या डोक्यांतून आरपार गोळी गेली होती. त्याचे सारे कपडे व्यवस्थितपणें एकवटलेले त्याच्या प्रेता-जवळच पडले होते.

## २

पॅरिसच्या मध्यवर्ती गुप्त पोलीस खात्यांत ही बातमी मिळतांच त्यांनीं आपल्या अत्यंत हुशार तरुण गुप्त पोलीस रॉबर्ट लद्रू याला 'तत्काळ तपास करायला' तारेनें हुकूम पाठवला.

## ३

रॉबर्ट त्यावेळीं सेंट अँद्रीजवळच दोन मैलांवर लाहावर गांवीं होता.

तार मिळतांच तो खुनाच्या जागेवर वायुवेगानें जाऊन पोंहोंचला.

रॉबर्ट त्याच्या खात्यांतला अगदीं तरणाबांड ! तरी आतांपर्यंतच्या चातुर्यावर त्यानें पुष्कळच मानसन्मान मिळवला होता.

चतुर गुप्तपोलीस म्हणून त्याचें नांव माहीत नाहीं, असा त्या वेळाच्या फ्रेन्च तरुण माणसांत एखादाच क्वचित् सांपडला असता.

लोक त्याच्या चातुर्याच्या गोष्टी सांगत—नुसते पायाचे ठसे पाहून तो त्या गुन्हेगाराच्या शरिराचे, चेहरेपट्टीचें अचूक वर्णन सांगे.

गुन्ह्याच्या ठिकाणीं पडलेल्या क्षुल्लक गोष्टींचा तलास लावून तो त्यावरून बरोबर माग काढीत आरोपीच्या मानगुटीवर शेंवटीं अचूक हात टाकी.

गुन्ह्याच्या ठिकाणीं रॉबर्ट गेला, कीं, किंचित् देखील घाई करत नसे. प्रेताभोंवतालीं एक वर्तुळ काढून त्यांत सांपडणारें बटन, कागदाचा कपटा, सिगारेटचें थोटुक, राख–अगदीं एखादी टांचणीसुद्धां–तो उचलून घेई; नि तेवढ्यावर मोठे धोरणी कयास बांधून तो माग काढीत गुन्हेगाराला पकडण्यांत यश मिळवी !

आणि या समयसूचकतेच्या नि धिम्या तर्कवादी स्वभावाच्या जोरावरच तो इतका यशस्वी झाला होता.

## ४

मात्र अशा तऱ्हेनें रात्रींच्या रात्री जागून गुह्याचा शोध लावण्यासाठीं तो विचार करी; तरी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर छाप बसवण्यासाठीं आपण अगदीं झटकन् पांच मिनिटांत त्या निर्णयाला येऊन पोहोंचलों, असाच भास निर्माण करी; त्यांच्यापुढें तसा मुद्दाम आव आणी.

या त्याच्या भयंकर श्रमांचा त्याच्या प्रकृतीवर मात्र अलीकडे फारच परिणाम झाला होता. त्याला झोंप फार कमी मिळे. आणि मिळे त्यांत सुद्धां त्याला निरनिराळे भयंकर भास होत; तो अलीकडे तर कधीं कधीं झोंपेंत मोठ्यानें ओरडूनही उठे !

त्याच्या दोस्त डॉक्टरांनीं त्याला सल्ला दिला होता, कीं—त्यानें वर्षभर तरी पूर्ण विश्रांति घ्यावी ! तरच त्याची बिघडलेली प्रकृति सुधारेल.

पण त्याच्यासारख्या महत्त्वाच्या नि उद्योगी माणसाला अशी मोठ्या अवधीची विश्रांती कुठली मिळायला ?—एक केस संपली किं दुसरी दत्त म्हणून त्याच्यापुढें उभी असे.

तेव्हां डॉक्टरांकडे पूर्ण दुर्लक्ष करून तो महत्वाकांक्षी मनुष्य, आपली नोकरीची जबाबदारी, डोकेबाज गुप्त पोलिसी तशीच पुढें चालवीत होता.

५

सेंट अँद्री गांवीं रॉबर्ट पोहोंचल्यावर त्यानें लागलीच गुन्ह्याचा कसून तलास चालू केला.

अँद्री मोने हा कांहीं मोठा लक्षाधीश नव्हता; अगर त्या सरळ माणसाची दुसरी कसलीं लफडींही नव्हती, कीं, त्याच्या पैशासाठीं अगर हेव्यादाव्यासाठीं त्याच्याविरुद्ध कसला कट होऊन खून पडावा !

त्याच्या कपड्यांत मिळालेल्या डायरीतल्या मजकुरावरून तर त्याचें कोणाशीं विशेष संबंधही असण्याचा संभव दिसत नव्हता.

बरें, त्याच्या वारसांनीं त्याचें असेल नसेल तेवढेंच कां होईना, वैभव लौकर मिळावें या आशेनें त्याचा खून केला म्हणावें, तर अँद्रीला त्याच्या बायकोशिवाय दुसरें कोणी वारसही नव्हतें.

आणि त्या बायकोचें तर अँद्रीवर फारच प्रेम; ती बिचारी त्याची वाट पहात त्या रात्रीं अडीचपर्यंत त्याच्या बिऱ्हाडाजवळ सचिंत मनानें येरझारा घालीत होती, असा पुरावा मिळाला; त्या बरोबरच कॉरोनरच्या मतें असें ठरलें होतें, कीं, खून १॥-२ च्या सुमारास झाला असावा.

नीट कांहींच तलास लागेना; म्हणून रॉबर्टनें आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें खून झालेल्या जागेभोंवतालच्या शंभर यार्डाच्या वर्तुळांत सांपडतील त्या सर्व वस्तू शोधण्याचा मार्ग अवलंबिला.

शेवटीं, त्या रात्रीं त्याला एकदम एक खूण सांपडली. त्याला तिच्या आधारावर गुन्हेगाराचाही पटकन् पत्ता लागला.

तो थोडा वेळ भांबावल्या मनानें आपल्याशींच विचार करीत गप्प बसला; नि मग आपल्या ऑफिसकडे जड पावलें टाकीत जाऊन पोंहोंचला.

## ६

आपल्या वरिष्ठापुढें उभें राहून तो अगदीं हलक्या आवाजांत म्हणाला, " साहेब, लागला तलास गुन्ह्याचा !—नि आरोपीचाही !—ह्या पहा प्रेताच्या जागेजवळच पडलेल्या पावलाचा एक ठसा !—मी प्लास्टरमध्यें तो उठवून घेतला आहे. खुनी मनुष्य दबकत दबकत अँद्री मोनेच्या मागून तेथें आला. त्याच्या पायांत फक्त स्टॉकिंग होते. त्याच्या डाव्या पायाच्या या ठशांतली विशेष गोष्ट आली कां लक्षांत तुमच्या ?—त्या खुनी माणसाच्या डाव्या पायाचा आंगठा तुटलेला होता ! "

" मग आतां आरोपीचाही पत्ता कसा लागला म्हणतां ? " अधिकारी रॉबर्टला आश्चर्ययुक्त कौतुकानें विचारूं लागला.

" तेंच सांगायला आलोंय् ! " रॉबर्ट पटकन् म्हणाला व खालीं वांकून त्यानें आपल्या डाव्या पायावरचा बूट काढला !

आपला बिनबोटाचा डावा पाय पुढें करून तो हळूंच म्हणाला—" आतांच माझ्या लक्षांत आलं ! काल रात्रीं झोपेंत मीच तो खून केला, महाराज !...."

## ७

रॉबर्टनेंच तो खून केला होता. त्या ठशांत त्याचा डावा पाय अगदीं बरोबर बसला. रॉबर्टचा आंगठा लहानपणींच तुटला होता.

रात्रीं झोंपत उठण्याच्या व निरनिराळ्या भासांत दिशाभूल होऊन भटकण्याच्या रॉबर्टच्या मानसिक रोगामुळेंच त्याच्या हातून तो खून आधल्या रात्रीं झाला होता.

पण खून म्हणजे खून !—रॉबर्टनें केला म्हणून काय झालं ?—

तत्काळ रॉबर्टला गिरफदार करण्यांत आलें व त्याच्यावर खुनाचा खटला भरण्यांत आला.

## ८

सेशन खटल्यांत रॉबर्टच्या वकिलानें मात्र त्याची बाजू मोठ्या वैशिष्ट्यपूर्ण प्रकारें मांडली.

प्रसिद्ध डॉक्टरांच्या मदतीनें त्यानें कोर्टांत असें सिद्ध केलें, कीं, रॉबर्टला निद्रानाशाचा व त्यामुळेंच रात्रीं निरनिराळे भास होण्याचा भयंकर रोग जडला आहे. त्यावर चालू वैद्यकींत कसलाच हमखास उपाय सांपडलेला नाहीं!—आणि तसल्या भासांत रात्रीं तो तसा झोंपेंत भटकतांना, वाटेल तें भयंकर कृत्य—त्याची इच्छा नसतांही—करूं शकेल!—हा त्याचा पहिलाच खूनही त्याच्या हातून असाच घडला!—

तेवढें सिद्ध झाल्यावर रॉबर्टच्या वकिलानें पंचांना व न्यायाधीशाला प्रश्न टाकला—" रॉबर्ट खुनी आहे,....त्या दृष्टीनें तो समाजांत वावरायला भयंकर मनुष्य आहे. पण केव्हां?—रात्रीं झोंपेंत असतांना! दिवसां जागेपणीं तो एक समाजाला उपयोगी असा चतुर सभ्य मनुष्यच आहे!—एवढं ठाऊक असूनही, न्यायाच्या नांवाखालीं त्याला फांशी देऊन, आतां तुम्हीही एक कायदेशीर खून करणार काय?"

## ९

सर्वांना त्याची ही विचारसरणी पटली; आणि सर्वानुमतें ठरलें, कीं, रॉबर्टसारख्या प्रामाणिक पण मनोरोगपीडित माणसाला फांशी न देतां त्याला जन्मभर तुरुंगवास द्यावा.

पण त्यांतही पुन्हां विचारांतीं एक सुधारणा करण्यांत आली.

रॉबर्टनें जागा असेपर्यंत—म्हणजेच सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत—जगांत एखाद्या स्वतंत्र माणसाप्रमाणें मोकळें फिरावें; आपली सामाजिक कर्तव्यें दुसऱ्या कोठल्याही सभ्य माणसाप्रमाणेंच पार पाडावींत!....पण सूर्यास्त होतांच ठरलेल्या तुरुंगांतील आपल्या ठरलेल्या कोठडींत जाऊन आपली जन्मठेपेची तुरुंगशिक्षा जन्मभर, रोज भोगावी!—

१०

आणि जगांतील आश्चर्य म्हणजे बरोबर एकावन वर्षेंपर्यंत दररोज रात्रीं रॉबर्टनें दिवसभर आपलीं स्वतंत्र कामें पार पाडून, ही जगावेगळी रात्रीच्या जन्मठेपीची तुरुंगशिक्षा ठरल्याप्रमाणें भोगली.

तो रोज़ रात्रीं कैदी होत असे !—

शेवटीं, सन १९३९ सालीं तो, एके दिवशीं रात्रीं आपल्या कोठडींतच कैदी म्हणून मरण पावला.

---

# ३-मानलेला मुलगा !....

आपल्याला आईबाप नसणं, आपण कोणाचा तरी नुसता मानलेला मुलगाच असणं, याची जाणीव एखाद्या लहान मुलाला एकदम झाली तर किती दुःख होईल त्याला ? त्याला संभाळणारी त्याचीं तीं मानलेलीं आईबापें अगदीं प्रेमळ असलीं, तरीही त्याला ती बातमी प्रथमच समजेल तेव्हां भयंकर धक्का बसेल; अगदीं दुःख होईल !—

पण टोनी हा अगदीं वेगळाच मुलगा होता.

वेबस्टरबाई कधींही नेड व टोनी या दोघांनाही बरोबर घेऊनच बाहेर पडत. नेड जरा मोठा नि टोनी लहान—दहाएक वर्षांचा !—पण नेडच्या कसल्या ना कसल्या लहानमोठ्या तक्रारी चालूच असत;....उलट, टोनी तगडा नि अगदीं खेळकर. उन्हातान्हांत बेछूट भटकून त्याचा चेहराही अगदीं निरोगी नि जरा रांकटच दिसे.

नेड मात्र नेहमीं आपल्या आईजवळच असे. अगदीं कोमल प्रकृतीचा दिसे. नि आईशिवाय त्याचं पानही हलत नसे क्षणभर !—

# २

टोनीला ठाऊक होतें–'आपली आई ही आपली खरी खुरी आई नव्हे!'; आणि खेळतां खेळतां बरोबरीचीं मुलेंही एखाद्या वेळीं एकदम ओरडून त्याला हिणवत—"ओऽ! टोनीला आईबाप नाहींत!.... हा टोनी ना,–आपल्या वेबस्टरबाईचा नुसता मानलेला मुलगा आहे!"

पण इतर मुलांना तें खरें वाटत नसे; आपापसांत त्यांचें त्याबद्दल भांडण सुरू होई. आणि शेवटीं खरेंखोटें करायला तीं सारीं टोनीसह वेबस्टरबाईकडे येत.

दुसरें कोणी माणूस आईजवळ बोलत बसलेलें असलें, तरी टोनी मुलांच्या त्या हिणवण्यानें लाजत नसे; उलट, मोठ्या धिटाईनें आईला त्याबद्दलच प्रश्न विचारी; नि बरोबरीच्या मुलांची त्याबद्दल खात्री करी.

तो अभिमानानें म्हणे—"खरंच कीं नाहीं ग, आई?—एके दिवशीं तूं नि पपा दोघांनीं ठरवलं, कीं, नेडबरोबर खेळायला आपल्याला दुसरा एखादा मुलगा पाहिजे घरांत!–म्हणून मग तुम्हीं अगदीं पुष्कळ ठिकाणीं फिरलांत! नि शेवटीं एके ठिकाणीं एक चांगला मुलगा दिसला तुम्हाला! तेव्हां तुम्ही तिथल्या लोकांना म्हणालांत—'हो, आपल्याला आवडला हा मुलगा! कृपा करून आमच्या घरीं न्यायला द्या तो आम्हाला!' हं,....तो तुम्हाला त्या दिवशीं आवडलेला छोटासा मुलगा म्हणजे मीच!–हो ना ग, आई?"

"हं!–" आई टोनीचे लाडानें गाल कुस्करून, हसत हसत म्हणे—"तुला पाहिल्यावर आम्हाला वाटलं, यालाच उचलून न्यावं, नेडबरोबर खेळायला!—"

"पण....त्यांनीं त्याच दिवशीं कांहीं तुमच्या हवालीं केला नाहीं मला!–हो ना?" टोनी मोठ्या अभिमानानें, जमलेल्या बाळगोपाळांना आपल्याला पूर्वीपासून ठाऊक असलेली सारी गोष्ट सांगे—"घरीं येतांना पपा नि आई सारखी म्हणत होती एकमेकांना–'शेवटीं, हा

पोरगा आपल्या हातीं लागतोय्, कीं, कोणी दुसरंच घेऊन जाणार त्याला–कोण जाणें!' हो ना ग, आई?"

वेबस्टरबाई पुन्हा हसत;–नि टोनीला कुरवाळीत म्हणत–"हं! जवळ जवळ महिन्यानं कां होईना, शेवटीं आम्ही तुला घेऊन आलोंच घरीं!—तेव्हां जीव भांड्यांत पडला आमचा!–"

पण नेड तेथेंच मुलांमध्यें असला तर त्याला त्यामुळें टोनीबद्दल फार वाईट वाटे; तो टोनीचा हात मोठ्या प्रेमानें आपल्या हातीं घेई; आणि त्याला म्हणे "चलरे, टोनी!—आपल्याला हव्यात कशाला या गोष्टी!—खेळायला चल!–"

टोनीची ती धिटाई नि खेळकर अल्लडपणा पाहिला कीं, वेबस्टर-बाईजवळ बसलेली एकादी बाई आश्चर्यानें अगदीं स्तंभितच होई; नि म्हणे—"काय तरी बाई!—असल्या गुणी मुलाला कोणी टाकलं असेल त्या अनाथाश्रमांत नेऊन कोण जाणे! अन् काय तरी धीट पोर! आपल्याला खरी आईबापें नाहींत याचं त्याला कांहींच कसं बाई वाईट वाटत नाहीं!"

त्यावर वेबस्टरबाई गंभीर हसून सांगत–"छे हो! त्याला उलट आम्ही एवढ्या निरनिराळ्या लहान मोठ्या मुलांतून पाहून निवडून आणला, याचाच मोठा अभिमान त्याला!–तो मला सांगतो पुष्कळदां–'नेड काय घरांतलाच! आवडला नसता तरी त्याला तुम्हाला ठेवावाच लागला असतां घरांत! अगदीं पोरगी असती नेड, तरी!–पण मी चांगला होतों म्हणूनच, तुम्हीं निवडून–मागून आणलांत मला घरांत!–' प्रथम ती बातमी त्याला सांगायला सुद्धां आम्हीं घाबरत होतों!—पण आतां तोच आपण होऊन सर्वांना हें सांगतो!"

आणि वेबस्टरबाईंनी टोनीला प्रथम ती गोष्ट कशी सांगितली, म्हणून बोलणें निघालें, तर त्या मागची ती हकीकत त्या अशी सांगत–

" खरं म्हणजे आम्ही टोनीला कित्येक वर्षे हें सांगितलंही नव्हतं!–शेवटींही त्याला स्वतः सांगितलं नाहींच आम्ही!—सगळ्यांना वाटायचं नेड नि टोनी दोघेही अगदीं आमचेच मुलगे!—"

" मग शेवटीं समजलं कसं त्याला ?–" ऐकणाऱ्याला उत्सुकतेनें कोडं वाटून, प्रश्न पडे—

वेबस्टरबाई पुढें सांगत—"मुलांचे वडील गेल्या वर्षीं वारले; तेव्हां माझी एक मैत्रीण मला भेटायला आली. मुलांचं कौतुक करतां करतां ती एकदम भान न राहून त्यांच्या देखतच म्हणाली....' यांतला तुझा खरा मुलगा कोणता ग ?'

" तिला मी पटकन् डोळ्यानें खुणावलं; तिनेंही लक्षांत येऊन विषय बदलला.

" तरी पण मुलांच्या कानावरून तो तिचा प्रश्न गेलाच होता.

" ती निघून गेल्यावर त्यांनीं माझ्या भोंवतीं गराडा घातला; नि मला त्याबद्दल फिरफिरून प्रश्न केले.

" शेवटीं, मला त्यांना सांगणं भागच होतं. मी शक्य तेवढं अगदीं संभाळून सारं त्यांना सांगितलं!

" नि आतां त्यानंतर टोनी तरीही कसा वागतोय् तें आपण पाहतोंच आहों!–"

ती गंमतच होती मोठी!–टोनीवर त्या बातमीचा कांहींएक परिणाम झाला नव्हता. सदा आजारी नेडबरोबर सुद्धां अगदीं एखाद्या समजुतदार मोठ्या माणसासारखा तो वागे!—

नेड नेहमी कुरकुऱ्या आजारी प्रकृतीचा! टोनी धडधाकट स्वच्छंदी!–पण तरी त्यानें कधीं नेडची चेष्टा केली नव्हती.

नेडचें आईवर नि बापावर फार प्रेम!–टोनीला आपल्याच उद्योगांत नि आपल्याच खेळांत आपलें मन रमवतां येत असे.

बापाच्या मृत्यूच्या धक्क्यानें नेडची प्रकृती पुन्हां बिघडली होती! टोनी चार दिवस रडला; नि पुन्हां आपला खेळांत रमून गेला!

कोणालाही नेडचें तें आपल्या आईच्या प्रेमावरच सर्वस्वी अवलंबून असलेलें आयुष्य पाहून मौज वाटावी.....

## ६

पण खरी वस्तुस्थिती वेबस्टरबाईनीं आपल्या त्या एका मैत्रिणीला नि तिच्या तरुण मुलीलाच फक्त त्यावेळीं सांगितली होती!....

त्यावेळीं त्या म्हणाल्या होत्या—"तुम्ही सुद्धां आई आहां–तुम्हाला एक गुपित सांगायला हरकत नाहीं!–टोनीच माझा खरा मुलगा! मुलबाळ नव्हतं म्हणून त्याच्या जन्मापूर्वी आम्ही नेडलाच घरीं संभाळायला आणला!...."

तें ऐकताच त्या दोघींना केवढा आश्चर्याचा धक्का बसला....

तेवढ्यांत वेबस्टरबाई पुढें म्हणाल्या,—"नेडला जर मी त्याची आई नव्हे असं कळतं, तर त्याला केवढा धक्का बसला असता?—मी म्हणजे त्याला अगदीं जीव की प्राण! माझ्या आधारानेंच तो जणूं जगत होता. उलट टोनी बेदरकार!—त्याच्यावर त्या बातमीचा कांहीं एक परिणाम झाला नाहीं!"

## ७

बरीच वर्षें झाली या गोष्टीला.–

आतां टोनी मोठा रुबाबदार तरुण झाला होता. आणि अमेरिकन आरमारखात्यांत एक अमलदार झाला होता.

वेबस्टरबाईंच्या मैत्रिणीची ती मुलगी आतां प्रौढ झाली होती.

एके दिवशीं एका हॉटेलांत अचानक त्या दोघांचीं इतक्या वर्षांनीं भेट झाली. तिनें टोनीला हांक मारली.

नंतर मागल्या गोष्टीबद्दल त्यांचें बोलणें झालें.

त्यांत तिला कळलें; नेड नेहमींच आजारी असे. आपली रासायनिक प्रयोगांची लॅबॉरेटरी नि आपली आई यांच्यांत रममाण राहून समाधानांतच तो फक्त अठ्ठात्रीस वर्षांचा असतांना मरण पावला.

अगदीं आपल्या आईच्या मांडीवरच त्याला मृत्यू आला होता.

८

"पण तुला सगळं खरं खरं समजलं केव्हां, टोनी?" त्याच्या त्या प्रौढ मैत्रिणीनें शेवटीं त्याला हळूंच प्रश्न केला.

"म्हणजे?—तुम्हालाही ठाऊक होतं तें?—" आश्चर्यानें तिच्याकडे गंभीरपणें पहात टोनी म्हणाला.

"हो!—पण आम्ही तें आजपर्यंत गुपितच ठेवलंय्!—" ती त्यांच्या जुन्या घरोब्याची प्रौढ मैत्रीण म्हणाली.

थोडा वेळ टोनी कांहींच बोलला नाहीं!—

मग अगदीं खोल खोल विचार केल्याप्रमाणें तो दुसरीकडेच पहात हळूहळू तिला म्हणाला—

"तें समजल्यावर तर माझ्या आईबद्दलचं माझं तोंपर्यंतचं प्रेम हजारपटीनें वाढलंच!—माझं लग्न झालंय्–मला मुलगा आहे!–इतकं असूनही, इतकीं वर्षं, मला मानलेला मुलगा म्हणत रहायला नि नेडला आपलाच मुलगा म्हणायला, तिला किती प्रयास पडले असतील?... त्याची कल्पनाच करवत नाहीं मला!....

"केवळ पोरक्या, सदा आजारी नि भावनाप्रधान नेडला त्याच्या आयुष्यभर तरी आई मिळवून द्यायची तिची दिव्य धडपड होती ती!—"

टोनीनें व त्याच्या बरोबरच त्या मैत्रिणीनें एक दीर्घ मुग्ध सुस्कारा टाकला!—

---

वा. क्र... ११९९० नों. दि. .........
दि. .........

# ४-मानसोपचार !....

१९१९ सालची गोष्ट ! हिंवाळ्याचे दिवस—

अमेरिकेंतल्या एका हवेशीर खेडेगावांत निरनिराळ्या ठिकाणाहून निरनिराळ्या धंद्याचे लोक आपापल्या निरनिराळ्या कामासाठीं नेहमी-प्रमाणेंच आले होते.

याच मंडळींत दोन प्रसिद्ध डॉक्टरही होते—

पण ते मात्र इतरांप्रमाणें हिंडते-फिरते आनंदी नव्हते ! मरायला टेंकले होते; मरायलाच तेथें आले होते...

## २

त्या दोघांपैकीं एक सुप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ होता; आपल्या धंद्याच्या अगदीं वरच्या टोंकापर्यंतची कीर्ति त्याला त्याच्या गुणामुळेंच प्राप्त झाली होती.

पण तरी आयुष्याच्या उताराला आज तो एक क्षयरोगी झाला होता; त्याच्या दोन्ही फुप्फुसांना रोगानें पूर्णपणें ग्रासलें असल्याची त्याची स्वतःची तरी आतां खात्री झाली होती.

त्यामुळें तो आपल्या जीवाला अगदीं पूर्णपणें कंटाळला होता. इतर डॉक्टर स्नेह्यांनीं योजलेल्या औषधोपचारांना त्यानें धाब्यावर बसवलें होतें. त्याची प्रेमळ बायको त्याच्या कितीही पाठीस लागली तरी तो औषधाचा थेंबही पोटांत घेत नसे. जवळ जवळ कांहींच खात नसे व चाकाच्या गाडीमधून त्याला सूर्यप्रकाशांत नेण्याची ज्या ज्यावेळीं त्याची बायको धडपड करी, त्या त्यावेळीं तो तिला धुडकावून लावी.

एका काळोख्या खोलींतच त्यानें आपला बिछाना घालायला लावला होता. तो काळोख अधिकच भयाण करण्यासाठीं कीं काय

कोण जाणें, त्यानें त्या खोलीच्या साऱ्या खिडक्या बंद करवून घेतल्या होत्या; आणि बिछान्यावर पडल्या पडल्याच तो सिगारेट मागून सिगारेट ओढीत असे. भोंवतीं साऱ्या खोलीभर राख आणि थोटकें अस्ताव्यस्त सांचत असत.

कोणी त्याबद्दल त्याला विचारलें तर तो सांगे,"....माझी केस आतां अगदीं हाताबाहेर गेली आहे! आतां मला लवकर मरण कसं येईल, याचीच मी वाट पहातों आहे !—आणि त्यासाठींच माझी ही खटपट !...."

## ३

त्याच खेड्यांत तिथून चार घरें टाकलीं, कीं, एक झोपडीवजा बैठा बंगला होता; त्यांत तो दुसरा मध्यमवयाचा डॉक्टर रहात असे.

तोही असाच अगदीं मरायला टेंकला होता. आपल्या तारुण्यांतही तो एक उत्कृष्ट शस्त्रकलानिष्णात म्हणून प्रसिद्धीस आला होता. तरी आतां संधीवाताच्या अगदीं शेवटच्या कोटीला गेलेला तो रोगी होता! त्याचें सर्व शरीर सांध्यासांध्यांतून ताठ झालें होतें.

नाहीं म्हणायला, डाव्या हाताचीं बोटें तेवढीं त्याला थोडी फार हलवतां येत असत एवढेंच.

तेव्हां निराश होऊन तो आपले उरले सुरले दिवस मोजीत मरत पडायलाच त्या खेड्यांत आला होता!

पण कर्मधर्मसंयोग असा, कीं, त्या दोघांचा एक मित्र त्या दोघांच्याही त्या परिस्थितींत केवळ योगायोगानें त्या दोघांना भेटला !

आणि त्या योगायोगानंतरच अगदीं चमत्कारिकपणें त्या दोघां-भोंवतालची परिस्थिती पालटूं लागली.

## ४

त्या क्षयरोगी मानसशास्त्रज्ञ डॉक्टरनां, इतक्या शेजारीं येऊन पडलेल्या या संधिवात झालेल्या डॉक्टरांची दादही नव्हती.

त्यांची ती एकूण करुण परिस्थिति त्या मित्राच्या तोंडून त्या मानसशास्त्रज्ञांना प्रथमच समजली; तेव्हां रोगानें झालेला त्यांचा भकास, उदास, प्रेतकळा आलेला चेहरा चटकन् एकदम पालटला !

डॉक्टर जरा नव्या कल्पनेनें आनंदून त्या मित्राला म्हणाले,—"अस्सं !....पण इतकीं वर्षें मी माझा धंदा केलाय् ! त्यांत अगदीं मरायला टेकलेल्या अनेक संधिवाताच्या रोग्यांनाही बरं केलं आहे मी !..हा रोग शरीराचा असतो खास ! पण रोग्याच्या मनावर देखील बरंचसं अवलंबून असतं, यशापयश !....'

तेवढ्या बोलण्यामुळेंही झालेले श्रम निवारण्यासाठीं, क्षणभर विसांवा घेऊन मानसशास्त्रज्ञ डॉक्टर पुढें भरभर म्हणाले, "खरं म्हणजे असं आहे त्याचं बघा ! आपलं कोंपर वांकवतांना एकदां भयंकर कळा येऊं लागल्या, कीं, मनुष्य साहजिकच आपल्या मनगटाचीही हालचाल थांबवतो; ओघानेंच हळूहळूं तिथलेही स्नायू घट्ट होतात; व एकदां तिथली कळ बिनसरावानें वाढली, कीं, ती थांबवण्यासाठीं रोगी आपल्या बोटांचीही हालचाल थांबवतो ! झालं ! रोग बळावत जातो; शरिरांतला जिवंतपणा ओरसतो; तें मृत्यूच्या जबड्यांत शिरतं !–रोगी खलास होतो शेवटीं आपल्या आपणच !!–"

५

तो मित्र त्या रोगी डॉक्टरांचा नवा उत्साह पाहून मनांतल्या मनांत आनंदला होता. पण कांहीं न बोलताच तो गुपचुप त्यांचें बोलणें पुढें ऐकत होता.

"उलट, वापरतां येत असलेला प्रत्येक सांधा, वाटेल तें झालं तरी वापरावयाचाच, नि दुखत असलेला प्रत्येक अवयव प्रयत्न करून ताळ्या-वर आणायचाच, असा धाडसी प्रयत्न करायचं माणसानें ठरवलं पाहिजे ! तर मग हां हां म्हणतां गाडं सुतासारखं ठिकाणावर येतं !..तुमच्या डॉक्टरांना

हें साधंसुधं तत्व सांगणारा कोण भेटला नाहीं वाटतं ? माझी जर त्यांच्याशीं एकदां मुलाखत झाली असती,....तर–" डॉक्टर एवढेंच बोलून सांगतां सांगतां गप्प झाले.

"कां बरं ? अगदीं सहज शक्य होईल तें !" तो मध्यस्त मित्र म्हणाला, "तुम्ही असं म्हणत होता, हें सांगूं कां त्यांना ? त्यांची नर्स गाडींतून ढकलत ढकलत त्यांना तुमच्यासमोर आणूं शकेल !"

"हं हं ! तेवढं मात्र करूं नका, कृपा करून !" मानसशास्त्रज्ञ डॉक्टर खोकत खोकत म्हणाले, "हें त्यांना आधींच सांगितलंत, तर तें कधींच माझ्याकडे येणार नाहींत !....पाहिजे तर एवढेंच सांगा त्यांना, म्हणावं, 'नुसतीं हाडकं राहिलेला, मरणाच्या अगदीं पंथाला लागलेला एक अगदीं मरणोन्मुख डॉक्टरच तुमच्या अगदीं शेजारीं रहायला आला आहे ! कंटाळला आहे जीवाला ! ठिकाणावरून हालतां सुद्धां येत नाहीं त्याला ! तुमच्यासारखा समान धंद्याचा एखादा क्वचित् कधीं गप्पागोष्टींना मिळाला, तर फार आनंद होईल त्याला !' "

## ६

मध्यस्त मित्र आपल्याशींच एकदां सौम्य हंसला; तेथून बाहेर पडला; नि सरळ त्या संधिवातानें आजारी असलेल्या डॉक्टरांच्या बंगल्यांत शिरला.

सुरवातीस त्यांची विचारपूस केल्यावर, मानसशास्त्रज्ञांनीं जसें अगदीं सांगायला सांगितलें होतें तसेंच त्या दुसऱ्या डॉक्टरांना त्यानें बोलतां बोलतां सारें सांगितलें.

क्षयरोगी असूनही खिडक्या बंद करून मानसशास्त्रज्ञ कसे जाणून बुजून मृत्यूशय्येवर पडले आहेत; अगदीं हट्टाला पेटून, सांखळीसारख्या सिगारेटस् ते कसे ओढत आहेत; आपल्या झटपट मरणाचीच सगळी व्यवस्था ते कशी करत आहेत; हेंहि त्यानें त्या डॉक्टरांना सांगितलें.

आश्चर्य मात्र असें, कीं, ही बातमी ऐकतांच संधिवातानें आजारी असलेल्या डॉक्टरांना त्या मानसशास्त्रज्ञ क्षयरोग्याची केस हाताबाहेर गेली आहे असें कांहीं वाटेना !—

## ७

" असेल, ते म्हणत असतील त्यांत तथ्यही असेल, कदाचित् !" हे दुसरे डॉक्टर पडल्या पडल्या मध्यस्त मित्राला म्हणाले, " पण असे सुखासुखी ते मरणार नाहींत; आपल्या केसबद्दल अभिप्राय द्यायला कोणत्याच डॉक्टरला कांहींएक अधिकार नसतो. ठाऊक आहे ना त्यांना ? कोणताही रोगी म्हणजे निराशच असायचा ! शरीरशास्त्राचं नुसतं ज्ञान नाहीं उपयोगी ! स्वत:बद्दलचं अनुमान, कोणत्याच रोग्यानें करणं बरोबर नव्हे ! चांगल्या चांगल्या डॉक्टरांची असल्याच अतिविचारानें मरणें ओढवलेलीं मी स्वत: पाहिलेलीं आहेत ! इतर रोग्यांच्या बाबतींत ते आपल्या ज्ञानाचा मोठ्या अक्कल हुशारीनें सदुपयोग करतील; पण आपल्या स्वत:च्या बाबतींत मात्र ते अतिशहाणे असतात; म्हणूनच ते दुबळ्या मनाचे होतात; त्यांच्यावर जाळें टाकणाऱ्या मृत्यूबरोबर ते नीट यशस्वी झुंज खेळत नाहींत !....आणि शेवटीं, हकनाक मरतात !- बस्सं ! मला वाटतं,....हेंच कारण आहे या बाबतींतही !—हे तुम्ही म्हणतां ते डॉक्टर मरणंच शक्य नाहीं !—मी अगदीं हमी घेतों !... मला भेटायला मिळालं पाहिजे होतं हो त्यांना—"

बोलतां बोलतां डॉक्टर थांबले; आणि नेहमीं कधीं दिसत नसे तें प्रशांत स्मित त्यांच्या चेहऱ्यावर एकदम झळकलें.

क्षणभरानें ते त्या मित्राला म्हणाले–"ठरलंच !–उद्यां माझ्या नर्सला त्या डॉक्टरांकडे मला घेऊन जायला सांगतों मी ! पण एक अडचण आहे मोठी !–त्या पायऱ्यावरून माझी तिचाकी वर नाहीं नेतां येणार तिला !—तेव्हां डॉक्टरना जरा पुढल्या ओटीपर्यंत येणंच भाग होईल !–

पण तें ठीकच होईल एकंदरींत!....नाहीं?.....त्या कोंदट खोलींतून ते बाहेर पडतील, नि दीडदोन तास तरी त्यांना सूर्याचं कोवळं ऊन मिळेल!"

पुन्हां आपल्याशींच आनंदून डॉक्टर भरभर म्हणाले–"आणखी गंमत अशी होईल, कीं, तेवढा वेळ तरी 'आपण मरणार' ही भावना त्यांच्या मनांतून बेडापार होईल!–नाहीं?–तुम्हाला कसं वाटतं?–माझ्याच रोगाची ते चौकशी करत रहातील तेवढा वेळ!–"

एवढं बोलून डॉक्टर अगदीं मनापासून हंसले.

त्यांचा मित्रही मनांतल्या मनांत हंसला.

९

दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांच्या मित्रानें सहज पाहिलें–तों मानसशास्त्रज्ञ डॉक्टर आपल्या पोर्चच्या पायऱ्यांजवळ कॉट टाकून पडले होते; नि हे दुसरे संधीवाताचे डॉक्टर आपल्या तिचाकींत बसून, त्या घराच्या पायऱ्यांखालून त्याच्याशींच बोलत होते.

दोन तीन तासांनीं तो मित्र परत आला; तरी ते दोघे तसेच बोलत तेथेंच होते!—

त्यानंतर कांहीं दिवसांनीं हा मित्र त्या मानसशास्त्रज्ञांना भेटाला.

मोठ्या उत्साहानें व हसतमुखानें ते त्याला सांगू लागले–"माझा तुमच्या डॉक्टरांबद्दलचा कयास अगदीं बरोबर होता!—आतां तर मी पैज मारतों तुमच्याशीं–त्यांची ती बाबागाडी त्यांना लौकरच सोडावी लागेल! त्यांचा ठाण देऊन बसलेला संधिवातही त्यांचं शरीर सोडून पार पळून जाईल!"

आणि दुसऱ्या डॉक्टरांना तो मित्र भेटायला गेला, तेव्हां अगदीं तोंडांतल्या तोंडांत खुदखुदत त्यांनींही त्याला नवी बातमी पुरवली—"काय तुमच्या निराश क्षयरोग्याला काढला कीं नाहीं मी, त्या त्याच्या

ऑंगळ काळोख्या खोलींतून बाहेर ? आणि असं रोजच चालवणार आहे बरं का मी ? त्यामुळें हळूहळू ते नक्की बरे होतील पहा !—";

पुढें अगदीं नेमानें ते दोघेहि डॉक्टर कित्येक महिने एकमेकांना असे सकाळीं मोठ्या उत्साही मनानें भेटत असत.

९

आणखी कांहीं महिने गेले; त्यांचा तो मित्र त्या गांवीं परतला.

शस्त्रकलानिपुण डॉक्टर अजूनही संधिवातानें थोडे फार थोटेच होते. पण आतां ते कुबड्यांच्या सहाय्यानें घरांतल्या घरांत मोठ्या प्रयासानें कां होईना फिरत असतांना दिसत होते.

आपल्या मित्राशीं बोलतांना ते त्याला म्हणाले–" तुमच्या मानसशास्त्रज्ञ डॉक्टरांची प्रकृति....मध्यें फारच बिघडली होती. कोणत्याच डॉक्टराला ते जवळ उभे करीत नसत. फक्त एकट्या मलाच त्यांनीं अपवाद ठरवलं होतं त्या नियमाला ! "–

मित्र उत्सुकतेनें ऐकत होता; त्याला डॉक्टर पुढें सांगू लागले– " त्या पायऱ्यावरून त्या तिचाकींतून मला वर चढवणं तर अशक्य होतं आमच्या नर्सला ! बरं, वेळेवर या खेड्यांत तेवढ्यासाठीं हुकमी माणसं कुठलीं मिळायला ? तेव्हां अगदीं नाइलाजानें मी या कुबड्यांचा पुन्हां उपयोग करायचं ठरवलं !—सुरवातीला खूप त्रास होई. पण मी तो सहन केला ! कारण माझ्याशिवाय त्या डॉक्टरांना नि त्यांच्या बिचाऱ्या बायकोला दुसरी कोणाचीच मदत नव्हती ! तेव्हां मला दुसरं गत्यंतरच नव्हतं !- पण प्रयास पडले तरी मी दोनतीनदां अगदीं त्यांच्या नडीच्या वेळीं लंगडत लंगडत कां होईना त्यांच्या घरांत जाऊन उपयोगी पडलोंच कीं !-"

क्षणभर थांबून पुन्हां हंसत हंसत ते उत्साहानें म्हणाले– " वास्तविक डॉक्टरची त्यांना कसली असणार जरूरी ?—पण त्यांना आपलं वाटलं एवढंच ! अहो, जगण्याची इच्छा पाहिजे होती आधीं !–

मी सांगितलं नव्हतं तुम्हाला मागें ? अशा माणसांच्या मनांत प्रथम एकदां जगण्याची इच्छाच उत्पन्न करायला पाहिजे !–मग त्यांचे तेच डॉक्टर असतात ! ते स्वतःच जिवंत होतात !–तुम्हाला गंमत सांगायची म्हणजे,....डॉक्टर आतां आपलं मानसशास्त्र माझ्यावर पाजळताहेत !.... त्यांना आतां अगदीं मरायला सुद्धां फुरसत नाहीं !—"

## ११

आणि मानसशास्त्रज्ञांना भेटायला जेव्हां त्यांचा हा मित्र गेला, तेव्हां त्यांच्यांतही बराच फरक पडलेला त्याला आढळला !—त्यांच्या तोंडावर आतां बरीच टवटवी आली होती. आपल्या पोर्चमध्यें टाकलेल्या कॉटवर ते संधिवाताबद्दलचें एक भलें मोठें पुस्तक वाचत पडले होते.

आपला तो मित्र बऱ्याच दिवसांनीं समोर दिसतांच, मोठ्या उत्साहानें ते त्याला आपल्या मानसोपचाराच्या प्रयोगाबद्दल सांगूं लागले–" या महाराज ! आमचा प्रयोग ठरल्याप्रमाणें अगदीं बरोबर यशस्वी होतोय्–आमचे डॉक्टर शेजारी आतां कुबड्यांच्या सहाय्यानें रोज आंतमध्यें शिरतात. तिचाकींतून शिरणारा हा प्राणी प्रथम कुबड्या कशा आणि केव्हां वापरूं लागला ?...माहीत आहे ?—"

एवढें म्हणून डॉक्टर मोठमोठ्यानें हसूं लागले आणि पुढें म्हणाले, " माझा क्षयरोग उलटला ! मी अत्यवस्थ झालों !—अशी बातमी मी उठवली तेव्हांपासून, बिचारा धडपडत रोज मला पहायला यायचा ! नाहींतर त्यानें तो प्रयत्न कधींच केला नसता. मी आणखी एक वर्षभर जगायला पाहिजे हो. म्हणजे पहाल माझा प्रयोग संपूर्ण यशस्वी झालेला ! आणि तुमच्या डॉक्टरना अगदीं सुटं रस्त्यानें चालतांना—"

आणि मानसशास्त्रज्ञांनीं वर्षभर नव्हे आणखी अठरा महिने जगांत काढले !

१२

त्यांचा तो संधिवाताचा रोगी जवळ जवळ साफ बरा झाला होता !

त्यानें तर आतां आपल्या नर्सबरोबरच लग्न केलें होतें.

आणि त्या नूतन जोडप्याला पहिला मुलगा होण्यापूर्वीं आमच्या मानसशास्त्रज्ञांनीं पुन्हां आपली मानसशास्त्रीय प्रयोगाची प्रॅक्टिस सुरू केली होती.

दोघा डॉक्टरांनीं मिळून धर्मार्थ औषधोपचाराची विविधप्रकारची सोय केली होती गांवांत !–

असे त्या पुढेंही ते दोघे पूरेपूर एकोणीस वर्षे जगले !

आणि १९३८ शेवटीं कांहीं महिन्यांच्या अंतरानें, बरोबरच इहलोक सोडून गेले.

त्या मित्राबरोबरच्या खाजगी संभाषणांत 'मी त्याला जिवंत ठेवण्याचा यशस्वी प्रयोग केला !' असं दोघेही आपल्यालाच यश घेत !

बाहेर केव्हांहि बोलतांना 'त्याच्या प्रयोगानेंच मी इतकीं वर्षे जगलों' असा एकमेकांच्या नांवाचा ते कृतज्ञतेनें उल्लेख करत.

पण खरी गोष्ट त्या दोघांनाहि–अगदीं त्या मानसशास्त्रज्ञालाहि —कळली नव्हती !—

ती ही, कीं, त्या दोघांनीं स्वतःच आपापला जीव बचावला होता !

# ५–जिवावरची घोडदौड !—

ऐतिहासिक घटनांमधलीच पण खाजगी गोष्ट आहे ही—

दुसऱ्या जेम्स राजाविरुद्ध अर्गाइलनें उठाव केला; त्यावेळीं अर्गाइलच्या बाजूस सर जॉन कॉचरॅन हा त्या वेळचा एक प्रसिद्ध सरदार मिळाला होता. आणि त्याच आरोपावर त्याला राजाच्या लोकांनीं पकडून एडिंबरो येथील टॉलबूथच्या तुरुंगांत नेऊन ठेवलें होतें.

त्याला त्याबद्दल फांशीची शिक्षाही झाली होती.

सर जॉनचें आपल्या मुलांवर फार प्रेम! पण तीं आपल्याला तुरुंगांत वारंवार येऊन भेटलीं, तर त्यांच्यावरही नाहीं तो संशय ठेवला जाऊन, त्यांचा जीव धोक्यांत पडेल, अशी सर जॉनला मनांत सारखी भीति वाटत होती. म्हणून त्यानें त्यांना आपल्याला भेटण्याची सक्त मनाई केली होती.

## २

इतकें असूनही एके दिवशीं सर जॉनची मुलगी ग्रिझेल आपल्या बापाला भेटायला गेली.

दोघांचीही दृष्टादृष्ट होतांच दोघांनाही फार वाईट वाटलें.

'आपला आतां कायमचा वियोग होणार' याची दोघांचीही मनांत दुःखपूर्ण खात्रीच झाली होती.

नाहीं म्हणायला एकच अगदीं अंधुक आशा होती.

सर जॉनच्या वृद्ध बापानें जेम्स राजाच्या दरबारांतील एका वजनदार माणसाकडे सूत्रें हालवलीं होतीं. व त्याच्या मदतीनेंच सर जॉनसाठीं जेम्स राजाकडे दयेचा अर्ज केला होता. तशी दया केल्यावर आज्ञापत्र लिहून आलें, कीं, सर जॉनचा जीव बचावणार होता.

पण ती गोष्ट म्हणजे एक फोल आशा दाखवणारी बाबच होती. कारण, फांशी देण्याचा दिवस–वेळ नक्की ठरला होता; वेळेवर चुकून दयापत्र आलें. तरच कदाचित् सर जॉनची सुटका व्हायची !

पण तें सारें वेळेवर होणें अगदीं मुष्कील होतें; कारण एडिंबरो ते लंडन अगर उलट हा प्रवास त्या काळीं कांहीं साधासुधा नव्हता. फांशीचा दिवस ठरलेला असल्यामुळें राजाच्या शिक्कामोर्तबाचा 'फांशी-हुकूम' जासूदाकरवीं वेळेवर पोहोंचण्यासाठीं, तोंपर्यंत कदाचित् एडिंबरोच्या वाटेवरच निघाला असण्याचा संभव होता.

त्याच वेळीं 'दया-पत्र' सुद्धां तुरुंगाधिकाऱ्यांना मिळालें असतें, तरच कदाचित् पारडें फिरलें असतें. सर जॉन जगूं शकला असता.

पण हें सारें वेळेवर झालें नाहीं तर ?

—तर–सर जॉन अगदीं शंभर टक्के ठरल्यावेळीं फांसावर लटकणेंच प्राप्त होतें !—

मागून पोंचणाऱ्या 'दयापत्रा'नें त्याचा जीव मागाहून थोडाच बचावणार होता ?

## ३

बापासमोर बसून, बापाकडे अश्रुभरल्या डोळ्यांनीं पहातां पहाता, ग्रिझेलनें या सर्व परिस्थितीचा लांबपर्यंत विचार केला होता.

विलंब न करतां नवें धोरण बांधलें होतें. अगदीं मनांतल्या मनांतच तिनें एक धाडशी बेतही ठरवून टाकला होता.

आणि ती स्वतःच तो सारा बेत पार पाडणार होती.

बापाची जणूं ती शेवटचीच भेट घेऊन ग्रेझील दुःखित अंतःकरणानें त्या तुरुंगांतून बाहेर पडली.

## ४

दुसऱ्याच दिवसाची गोष्ट ! अगदीं सकाळींच घोड्यावर बसून, ग्रिझेल घरांतून एकटीच बाहेर पडली.

दक्षिण दिशेला वेगानें घोडा पिटाळून ती प्रथम एका खेड्यापाशीं येऊन थांबली. तेथें एका झोंपडींत तिची लहानपणची दाई रहात असे. तिच्या मुलाचे पुरुषी कपडे आंगावर चढवून ग्रिझेल पुन: पुढल्या मार्गाला लागली.

लंडनकडून पत्रें घेऊन येणाऱ्या जासूदाला मधल्यामध्यें गांठावयाचें तिच्या मनानें गुप्तपणें ठरवलें होतें.

सर्व माहिती आधींच काढून ठेवलेली असल्यामुळें, ज्या ठिकाणीं जासूद विसांवा घेण्यासाठीं थांबणार, असा तिचा कयास होता, तेथें ती अगदीं वेळेवर येऊन पोंहोंचली.

तेथें तो जासूद एकाटाच झोंपीं गेला होता. त्यानें बरीच घोडदौड केली असल्यामुळें त्याला खूप श्रम झाले होते. त्या थकव्यानें त्याला अगदीं मेल्यासारखीच झोंप लागली होती.

पण तो गाढ झोंपला होता, तरी त्याच्याबरोबरची ती पत्रांची मोठी पिशवी त्याच्या अंगाखालींच पडली होती.

त्यांत बहुतेक सर जॉनला फांशीं देण्याला परवानगी देणारी ती भयंकर राजाज्ञा बांधलेली होती !—ग्रेझीलला खात्री होती त्याची !

## ५

ती पिशवी पटकन् हळूंच बाजूला काढून घ्यावी असा ग्रेझेलच्या मनांत विचार आला. पण तेवढ्यांतच तो तिला घातुक वाटला ! 'तो जासूद पिशवी ओढतांना जागा झाला तर ? आपण एक स्त्री, तो एक पुरुष !–साराच घात व्हायचा !....'

तेव्हां तिनें आपला विचार बदलला; हळूंच त्याच्या जवळच्या पिस्तुलांतल्या सार्‍या गोळ्या बाहेर काढून घेतल्या व ते पुन्हां होतें तसें जागच्या जागीं ठेवलें.

एवढें झाल्यावर ती लगबगीनें पुन्हां आपल्या घोड्यावर स्वार झाली; जासूद नक्की ज्या रस्त्यानें जाईल त्याच वाटेनें ती थोडी पुढें गेली; तेथें त्याचीच वाट पहात एका झाडाजवळ उभी राहिली !–

## ६

थोड्या वेळानें जासूद आपल्या गाढ निद्रेंतून जागा झाला; आणि घोड्यावर टांग टाकून ग्रेझिल जेथें उभी होती, त्या बाजूला त्यानें आपला घोडा वेगानें फेंकला.

पण तोंपर्यंत ग्रेझील प्रसंगाला कावेबाजपणें तोंड द्यायची सारी तयारी करूनच तेथें उभी राहिली होती.

जासूद जवळ येतांच, तिनें त्याला हसून अभिवादन केलें; त्याची आस्थापूर्वक चौकशी केली व त्याच्या घोड्याबरोबरच ती पुढल्या मार्गाला दौडूं लागली.

थोडा वेळ गप्पा-विचारपूस करीत ती दोघें तशी पुढें गेली असतील-नसतील, तोंच ग्रेझीलला जासूदाच्या गाफीलपणाची पुरी खात्री झाली; मग ती हळूंच त्याला म्हणाली,—" बरं महाराज! अवांतर गोष्टी पुरे झाल्या आतां ! आपल्या जवळची ती टपालाची पिशवी प्रथम माझ्या हवालीं करा कशी ! "—

'आपल्याबरोबरचा तो रुबाबदार तरुण आपली थट्टाच करीत आहे ! ' असेंच जासुदाला प्रथम वाटलें.

पण ग्रेझिलनें तीन चारदां आवाज चढवीत, त्याला दमांत घेऊन त्याच टपालाच्या पिशवीची फिरफिरून मागणी केली; तेव्हां मात्र तो एकदम गोंधळला !-

आणि शेवटीं तर तिनें आपलें पिस्तूलच त्याच्यावर रोखून धरीत त्याला हुकुम केला—" बऱ्या बोलानें ती टपालाची पिशवी माझ्या हातीं दे !—नाहींतर घात होईल !—"

## ७

जासूद एकदम खूपच रागावला; त्यानें स्वसंरक्षणार्थ आपलें पिस्तूल झटकन् काढलें; व ग्रेझिलवर तें रोखून त्याचा चाप दाबला.

पण बार कांहीं उडाला नाहीं. त्याला भयंकर आश्चर्य वाटलें. त्यानें पुन्हां एकदां चाप ओढला; पण पुन्हां तेंच !—

निकामी पिस्तुलामुळें खूप चिडून तो आपल्या घोड्यावरून उडी टाकून खालीं उतरला व आपल्याशीं दगलबाजी करणाऱ्या त्या बरोबरच्या तरुण घोडेस्वारावर—ग्रेझिलवर त्वेषानें चालून गेला.

ग्रं. क्र. ११४० ...... ४०

पण त्यावेळीं कशी चपलाई करायची याबद्दल ग्रेझिलनें आधींच तयारी केली होती!—

घोड्याच्या जीनाला अडकवलेली ती लाख मोलाची टपाल-पिशवी तिनें चटकन् त्याच्याकडून हिसकावली व ती आपल्या घोड्यावरून विद्युत् वेगानें दौडूं लागली.

घोडा पिटाळीत पिटाळीत ती एका दाट अरण्यांत पोहोंचतांच तेथें थांबली.

लागलींच त्या टपाल-पिशवींतून तिनें तिला पाहिजे असलेलें तें तिच्या बापाच्या फांशीचें आज्ञापत्र काढून घेतलें—

आणि पुन्हां घोडदौड करून ती आपल्या त्या दाईच्या झोंपडींत पोहोंचली.

## ८

तेथें तिनें आपला पुरुषी पोषाख बदलून पुन्हां आपला नेहमींचा पोषाख अंगावर चढवला; आणि तशीच पुढें दौड करीत ती एडिंबरोला जाऊन पोहोंचली.

फांशी देण्याचें आज्ञापत्र तुरुंगाधिकाऱ्याला वेळेवर मिळालें नाहीं. त्यामुळें अर्थातच सर जॉनला ठरल्यावेळीं फांशी देतां आलें नाहीं.

हा अवकाश मिळाला तेवढ्यांत सर जॉनच्या बापाचा दरबारांत वशिला लागला होता.

जेम्स राजानें आपल्या पदरच्या सरदारामार्फत सर जॉनच्या बापाकडून मोठी लांच घेऊन सर जॉनवर दया केली होती.

दुसऱ्याच दिवशीं 'दया-पत्र' एडिंबरोला पोहोचलें व सर जॉनचा जीव बचावला.

पण त्या जासूदाच्या हातचें फांशीचें आज्ञापत्र त्या दिवशीं वेळेवर तुरुंगांत पोहोंचलें असतें तर या दया-पत्राचा काय उपयोग होणार होता?—

तें फांशीचें आज्ञापत्र मोठ्या चलाखीनें व धाडसानें मधल्यामध्यें गहाळ करणाऱ्या ग्रेझीलनेंच आपल्या बापाचा जीव वांचवला होता.

---

## नवव्या पुष्पानंतर— [ पालकांस ]

‘ **अजिंक्य पंडित** ’ व ‘ **कड्यावरील गाडी** ’ हीं ( अनुक्रमें **८ वें** व **९ वें** अशीं ) दोन पुष्पें आम्ही आज प्रकाशित आहों.

**५ डिसेंबर १९४३** रोजीं या प्रकाशनांबाबत आम्ही पहिलें पत्र काढलें; त्यावेळीं आम्हाला इतक्या अडचणी आमच्या मार्गांत येतील याची कल्पनाही नव्हती. त्यावेळीं आम्ही सुमारें १८ पुष्पें एकाच गटांत काढण्याचा विचार केला होता. पण त्यानंतरच्या परिस्थितीनुरूप कागदाच्या टंचाईमुळें स्वतःच्या कल्पनांना मुरड घालून शेवटीं १२ पुष्पेंच ( दीपावली १८६६ रोजीं ) प्रसिद्ध करण्याचें जून १९४४ मध्यें मुक्रर केलें होतें.

पण त्यांतही इतर अनेक अडचणी येऊन, शेवटीं, दिवाळीनंतर कां होईना, सातच पुष्पें प्रसिद्ध करूं शकलों. त्यावेळीं संस्थेच्या ५ डिसेंबर या आजच्या स्थापना दिनीं उरलेलीं ५ पुष्पें एकदम प्रकाशूं अशी अपेक्षा ठेवली होती.

पण दरम्यानच्या खाजगी प्रसंगाच्या माऱ्यामुळें व छपाईच्या अड-चणीमुळें आतां फक्त पांचापैकीं हीं दोन पुष्पेंच प्रसिद्ध करणें आम्हाला आज शक्य होत आहे.

आजच्या दिवसात प्रकाशन करणारा प्रकाशक सर्व दृष्टीनें किती मेटाकुटीला येतो याची वाचकाना कल्पनाही करतां येणार नाहीं.

एके काळचे गरजू छापखानदार नि कागद विक्रेते आज त्याला पैसे असूनही वाटेल तशी वेसण घालून वाटेल तसे बसवूं-उठवूं शकतात; त्याच्या प्रकाशनाचा आपल्या क्षुल्लक फायद्यासाठीं सहजासहजीं व सुकासुकी बोजवारा उडवूं शकतात; त्याचा एकही बेत वेळेस सिद्धीस जाऊं देत नाहींत. आजचा प्रकाशक त्यांच्या दृष्टीनें आधीं मूर्ख असतोच; त्यांच्याच करणीनें तो लोकांच्या दृष्टीनेंही मूर्ख ठरतो. परिस्थितीनुरूप ( स्वतःची इच्छा नसूनही ) पुस्तकांची विक्री किंमत प्रकाशकाला जास्त ठेवावी लागते.

अशा परिस्थितींतूनही वाटचाल करून ( रसिकांच्या आश्रयाची मनांत आशा व खात्री बाळगूनच ) आम्ही ‘अमर ज्योति वाङ्मया’चीं हीं नऊ पुष्पें प्रकाशित करूं शकलों याबद्दल आम्हाला समाधानच वाटतें.

या नऊ पुष्पांत आम्ही ‘ **न्याय चातुर्य-कथा** ’ १-२--३-४

व ‘ **अभिनव सत्यकथा** ’ १–२ अशीं एकूण सहा कथा-पुष्पें ( जाणत्या लोकांकडून लिहवून घेऊन ) संपादित करून बाल–वाचकांना सादर केलीं. कथा–बीजांतील गोडवा, रचनेचें कौशल्य व भाषा–वर्णनशैली, या दृष्टीनें ती सर्व पुस्तकें नाविन्यपूर्ण आहेत, अशी आमची खात्री आहे. चरित्र वाङ्मयांत ‘ **प्रफुल्लचंद्र रे यांचें जीवन–चित्र** ’ सादर केलें. ‘**माणसाचें शेंपूट** ’ हें शास्त्रीय स्वरूपाचें पण मनोरंजक पद्धतीनें लिहिलेलें पुस्तक मुलांच्या हातीं दिलें; व ‘ **गीतज्योती** ’ हें अगदीं अभिनव पद्धतीनें छपाई केलेलें किशोर अभिनय गीतांचें सर्वांगसुंदर पुस्तक शक्य तितक्या कमी किंमतींत बालकांना सादर केलें. हीं संस्थेचीं पुस्तकें बाह्यांगाच्या दृष्टीनेंही सुंदर करण्याचा प्रयत्न खर्चाकडे न पहातां केला. हें सर्व बालकांकडे व त्यांच्या पालकांकडे रुजूं होईल अशी आम्हाला उमेद आहे.

आतां ‘ **मी लेखक होणार** ’ हें वाङ्मय–ग्रथनाबाबतचें चर्चात्मक पुस्तक, ‘ **कांहीं कमळें** ’ ही कुमार वाचकांसाठीं छोटी कादंबरी व ‘ **चार वीर** ’ हें ‘मोठ्यांच्या छोट्या गोष्टी’ या सदरांतील मनोरंजक व उद्बोधक पुस्तक, अशीं तीन पुष्पें प्रथम वर्षाच्या गटांपैकीं उरलीं. तीं अमुकच दिवशीं प्रकाशित होतील याबद्दल आम्हाला आज अंदाज नाहीं. त्यांची छपाई चालू आहे; व ती पुरी होतांच आम्ही पुढील दोन तीन महिन्यांत प्रकाशांत आणूं, एवढेंच येथें आम्ही आश्वासन देऊन ठेवतों.

ओघानेंच येथें एक व्यवहाराबाबत स्पष्टीकरण करणें भाग आहे. १२ पुष्पांच्या गटाची ( आतांपर्यंतच्या पुस्तकांच्या आंतील कव्हरावर ) ‘ **परिचय सवलत** ’ जाहीर केली आहे; त्याबाबत स्पष्टीकरण असें, कीं, **संस्थेच्या सुरवातीच्या कार्यांतच ज्यांचा परिचय होईल, त्या ग्राहकांनाच फक्त सर्व पुस्तकें ४-१२-० त सवलतीनें मिळतील. म्हणजे ता. १५ फेब्रुवारी १९४५ च्या आंत ज्यांच्याकडून संस्थेकडे रु. ४-१२-० ची मनीऑर्डर येईल त्यांना आज प्रसिद्ध झालेलीं ९ पुष्पें पाठवलीं जातील व उरलेलीं तीन प्रसिद्ध होतांच पाठविण्यांत येतील. या मुदतीनंतर ही सवलत मिळणार नाहीं.**

आजपर्यंत संस्थेच्या कार्यांत ज्यांनीं ज्यांनीं प्रत्यक्षाप्रत्यक्ष साहाय्य केलें त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहों.

या पुढील प्रकाशनाबाबत आमच्या पुष्कळ कल्पना आहेतच. त्यांत कांहीं सूचना केल्यास अगर प्रत्यक्ष लेखनसाहाय्य करण्याच्या हेतूनें कोणी आपलें अप्रसिद्ध पुस्तक आमच्या अवलोकनासाठीं पाठविल्यास आम्ही त्यांचे आभारी होऊं.

**५ डिसेंबर, १९४४** ★ विनम्र—**चालक.**

या संस्थेच्या कार्यांत फायद्याची विशेष दृष्टी नसली तरी व्यवहार संभाळणें व त्या बाबतींत संभाळून पाऊल टाकणें भाग आहे. **संस्थेला मिळणाऱ्या रसिकाश्रयावर व गुंतलेली रक्कम मोकळी होण्यावरच संस्थेचें प्रत्येक पुढील वर्षाचें कार्य मुख्यतः अवलंबून रहाणार.** तेव्हां (संस्थेला मिळणाऱ्या आश्रयाचा आगाऊ अंदाज येण्यासाठी) **आम्ही 'कायम ग्राहकत्वा'ची योजना उपयुक्त म्हणून मुक्रर केली आहे.** पुस्तकाची कितीही लहान आवृत्ती काढली तरी **ग्राहकांना त्यांची प्रत प्रथम मिळेल.** आणि ती पुन्हां **सामान्य गिऱ्हाइकापेक्षां अधिक सवलतीनें मिळेल.** शेवटीं हा प्रश्न सदिच्छा व सहकार्यावर अवलंबून असल्यामुळें **फक्त मामुली चार आणे प्रवेश फी** घेऊन कोणत्याही मुलामुलीस आम्ही ग्राहकपटावर नोंदवून घेऊं. ग्राहकानें संस्थेतर्फे प्रसिद्ध होणारी **दरवर्षींचीं सर्वच प्रकाशनें विकत घेतलीं पाहिजेत, असा आमचा आग्रह राहणार नाहीं.** (घेतलीं तर तीं त्याला सवलतीनें मिळतीलच.)

मात्र **कोणतीहि गटांतील पांच रुपयाचीं पुस्तकें नक्त रुपये चार किंमतीस त्याला मिळतील,** तीं पुस्तकें दरवर्षी त्यानें घेतलीं, तरच त्याचें ग्राहकत्व कायम राहून पुढेंहि त्याला सवलत मिळत राहील. **पुस्तकाची किंमत परिस्थितीनुरूप परवडेल तितकी कमीतकमी ठेवणार आहोंत. पण तरीही सामान्य गिऱ्हाईकापेक्षां अधिक सवलत कायम ग्राहकासच मिळणार आहे.** तेव्हां या योजनेचा फायदा घेण्याची इच्छा असणाऱ्या पालकांनीं संस्थेशीं याप्रकारें जरूर सहकार्य करावें.

## प्रथम वर्षाची विशेष फायद्याची 'परिचय सवलत--'

**या वर्षाच्या एकूण बारा पुष्पांची किंमत रु. ५-१२-०** होते. चार आणे प्रवेश फी भरल्यावर **हींच सर्वांगसुंदर पुस्तकें ग्राहकांना रु. ४-१२-० स पडतील.** पालकांचा नवीन परिचय व्हावा म्हणून व संस्थेच्या ग्राहक योजनेला मूर्त स्वरूप यावें म्हणून रु. ४-१२-०+०-४-०=५-१-० ) **अशीं एकूण नक्त रु. ५-१-० चीं** हीं पुस्तकें, रु. ४-१२-० **मनीऑर्डरीनें पाठविल्यास, आमच्या खर्चानें अनरजिस्टर्ड बुकपोस्टानें आमच्या या नवपरिचित ग्राहकाला पाठवून त्याचें न[...] न घेऊं.**

**कचेरी:--अमर ज्योति प्रका**[...]ट, दादर.

IRBK-0101997
IRBK-0101997

रघुवीर सामंत संपादित

# अमर

## — ज्योति वाङ्मय —

* नव्या दृष्टीचीं, नव्या पद्धतीचीं, हीं नवीं विविध पुस्तकें आपल्या मुलामुलींच्या हातीं द्या !—

* तीं त्यांची करमणूक करतीलच; पण त्याबरोबरच त्यांना अधिक रसिक बनवतील !—

* हीं व असलीं पद्धतशीर पुस्तकें अव्याहत प्रकाशित करण्यास साहाय्य करण्यासाठीं, या प्रकाशन-संस्थेचे, फक्त चार आणे भरून व रु. चारचीं सवलतीनें पुस्तकें घेऊन कायम ग्राहक व्हा. ग्राहकांना दर दिवाळींत प्रसिद्ध होणारीं (सर्व अगर रु. ४ चीं) पुस्तकें विशेष सवलतीनें मिळत जातील

## ❀ प्रथम वर्षांतील ❀

१२—दीपावली-प्रकाशनें—१२

[ मनोरंजन विभाग ]

I न्याय-चातुर्य-कथा
(किशोर श्रेणी)
१ मडक्यांतला न्याय आणि इतर कथा
२ नशिबाची परीक्षा आणि इतर कथा
३ जलदेवतेचा न्याय आणि इतर कथा
४ अजिंक्य पंडित आणि इतर कथा

II सत्यकथा—
(कुमार श्रेणी)
१ कड्यावरील गाडी आणि इतर कथा
२ शूरांचा गांव आणि इतर कथा

III अभिनय-गीतें
(किशोर श्रेणी)
१ गीत ज्योती

IV दीर्घ-कथा
१ कांहीं कमळें

V मोठ्यांच्या छोट्या गोष्टी
(कुमार श्रेणी)
१ चार वीर
२ 'प्रफुल्लचंद्र'

[ ज्ञान विभाग ]

VI शास्त्रीय कुतूहल. (कुमार श्रेणी)
१ माणसाचें शेंपूट.

VII वाङ्मयीन चर्चा. (कुमार श्रेणी)
१ 'मी लेखक होणार.'

सानविलकर लिथो प्रेस; मुंबई २